Est. Sept 1994
2(f) & 12 (B): March 2006
Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's
LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE
COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)
NAAC Accredited with Grade- B
(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000
Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth 431516 Sonpeth, Dist. Parbhani (MAHARASHTRA)

# Departmental Activity Report

- Name of the Department: marathi

1. Name of the Activity: marathi Language conservation fortnight
2. Date: 17/01/2023 to 24/01/2023
3. Place & Time: Department of marathi
4. Objectives of the Programme: 1) To develop interest in students towards marathi language
   2) To promote the writing, reading and comprehension of marathi language.
5. Guests/Resource Persons: 1) Dr. S.D. Sonsale 2) Dr. B.M. Kale 3) Dr. S.V. Rankhamb 4) Mrs. Manisha Andhale
6. Abstract of the Programme: on the occossion of marathi language fortnight, spelling and handwriting competition, organization of exhibition of marathi literature, and many more programmes were arranged by the marathi Department
7. Total Beneficiaries: 50
8. Achievements/ Outcomes: marathi language and its comprehensiveness will be understood.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

## मराठी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२-२३

| भाग - अ | |
|---|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | 2) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | १) शुद्धलेखन स्पर्धा<br>२) मराठी साहित्य ग्रंथ प्रदर्शन<br>३) मराठी भाषेतील नवोदित ग्रंथांचा परिचय<br>४) निबंध लेखन स्पर्धा<br>५) निमंत्रित कवींचे कवी संमेलन<br>६) मुस्लिम सत्यशोधक समाजाचे संस्थापक अमित दलवाई यांच्या जीवनावरील 'हमीद अनसंग ह्युमॅनिस्ट' या माहितीपटाचे सादरीकरण<br>७) भित्तीपत्रक प्रकाशन व बक्षीस वितरण |
| दिनांक- | 17 जानेवारी 2023 ते 24 जानेवारी 2023 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | विद्यार्थ्यांच्या लेखन स्पर्धा<br>ग्रंथालयातील मराठी साहित्याचे प्रदर्शन<br>मराठीतील नवोदित तीन ग्रंथांवर मान्यवरांची परिचय वजा प्रतिक्रिया<br>तंत्रज्ञान युगात बदलती मराठी भाषा या विषयावर निबंध लेखन स्पर्धा<br>कवी प्रेमानंद शिंदे वसमत व एडवोकेटसौ मनीषा आंधळे सोनपेठ यांचे कवी संमेलन<br>निवडक विद्यार्थ्यांचे भित्तिपत्रक प्रकाशन व मान्यवरांच्या हस्ते बक्षिसाचे वितरण |

| | | |
|---|---|---|
| उद्देश | १ | विद्यार्थ्यांच्या मनात मराठी भाषेविषयीची आवड विकसित करणे. |
| | २ | मराठी भाषा आकलन, लेखन व वाचन यासाठी प्रवृत्त करणे. |
| | ३ | मराठीतील नव्या मौलिक ग्रंथांचा परिचय करून देणे. |

| | | |
|---|---|---|
| | ४ | मराठी परिवेशातील हमीद दलवाई यांच्या विचार कार्याचा आवाका व स्वरूप समजावून सांगणे |
| | ५ | निबंध लेखनाद्वारे सुसंगत व तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे. |
| | ६ | कवी संमेलना द्वारे मराठीतील कविता व तिचे सादरीकरण तंत्र विद्यार्थ्यांना शिकवणे. |
| | ७ | प्रमाणपत्र व बक्षिसांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची जाणीव वाढीस लावणे |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | प्रोफेसर डॉ. सा.द.सोनसळे, डॉ संतोष रणखांब, सुरेश मोरे, कवी प्रेमानंद शिंदे, सौ. मनीषा आंधळे, विभाग प्रमुख व प्रोफेसर डॉ बालासाहेब काळे व प्रा. सखाराम कदम |
| उद्घाटक | | प्राचार्य डॉ. वसंत सातपुते |
| ठिकाण | | कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ |
| उपस्थिती | विद्यार्थी | ९० |
| | कर्मचारी | १७ |
| | इतर | ४ |
| | एकूण | १११ |

| भाग - ब |
|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक संक्षिप्त विवरण |

मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. बालासाहेब काळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, साहित्यिक प्रोफेसर डॉ. सा.द.सोनसळे, प्रा. सखाराम कदम, सुरेश मोरे यांच्या उपस्थितीत दिनांक 17 जानेवारी 2023 ते 24 जानेवारी 2023 दरम्यान मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पहिल्या दिवशी शुद्धलेखन व हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या यासाठी कनिष्ठ व वरिष्ठ गटातील एकूण 88 विद्यार्थी सहभागी होते.

भाषा संवर्धन पंधरवड्याच्या दुसऱ्या दिवशी ग्रंथालय विभागाच्या सहकार्याने मराठी साहित्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल डॉ. अनंतकुमार सरकाळे व श्री संतुक परळकर यांचे सहकार्य लाभले.

तिसऱ्या दिवशी मराठी भाषेतील नवोदित ग्रंथांचा परिचय कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये कोबाड गांधी लिखित 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम', राकेश वानखेडे लिखित 'गिनिपिग', गणेश आवटे लिखित 'कुरंगी पाडस' या नवनव्या पुस्तकांचा परिचय अनुक्रमे डॉ. संतोष रणखांब, डॉ. बालासाहेब काळे व प्रा. सखाराम कदम यांनी करून दिला.

भाषा संवर्धन पंधरवड्याच्या चौथ्या दिवशी मुस्लिम सत्यशोधक समाजाचे संस्थापक व परिवर्तनवादी विचारवंत, लेखक हमीद दलवाई यांच्या जीवन कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा म्हणून Hamid:The unsung Humanist या माहितीपटाचे प्रोजेक्ट द्वारे महाविद्यालयात सादरीकरण करण्यात आले. यासाठी तांत्रिक सहाय्य डॉ. मुकुंदराज पाटील, प्रा.विकास रागोले व प्रा. संदीपकुमार देवराये यांनी केले.

भाषा संवर्धन पंधरवड्यातील पाचव्या दिवशी तंत्रज्ञान युगात बदलती मराठी भाषा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ दोन्ही गटासाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आल्या. दोन्ही गटातून अनुक्रमे तीन तीन निबंधांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

भाषा संवर्धन पंधरवड्याच्या सहाव्या दिवशी कवी प्रेमानंद शिंदे व सौ मनीषा आंधळे या निमंत्रित कवींच्या कवी संमेलनाचे आयोजन सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले होते. याद्वारे कविता व कवितेचे सादरीकरण तंत्र विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षपणे शिकवण्यात आले.

24 जानेवारी 2023 रोजी महाविद्यालयात निवडक विद्यार्थ्यांचे भित्तपत्र प्रदर्शन करून विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

उपक्रम / कार्यक्रमाची उपयुक्तता

मराठी भाषा व तिची व्यापकता समजून येईल.

मराठी भाषा व तिचे उपयोजन कौशल्य वाढीस लागेल.

मराठी भाषेतून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

मराठी भाषिक समूहात एकतेची वाढ होईल.

इतर भाषेचे मराठी भाषेवरील आक्रमण व आकर्षण कमी होईल.

मराठीतील उत्तमोत्तम साहित्यकृती विद्यार्थ्यांना समजून येतील.

भाग - क

उपक्रम / कार्यक्रमाचे  खर्चाचे विवरण

| अ क्र | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | झालेला खर्च (रु ) | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | प्रतिमापूजनासाठी हार<br>गुलाल<br>शाल<br>बुके<br>पाहुण्यांचे चहापाणी | ९० रू.<br>१० रू.<br>५०० रू.<br>१२० रू.<br>४० रू. | |
| एकूण खर्च | | ७६० रू.<br>------ | |

अहवाल सादर करणाऱ्या समिती / विभाग

| पद | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | प्रोफेसर डॉ. बालासाहेब काळे | |
| समन्वयक | प्रोफेसर डॉ. सा.द.सोनसळे | |
| सदस्य | प्रा. सखाराम कदम | |

अहवाल सदर केल्याचा दिनांक :  २८ /०१ / २०२३

Principal
Late.Ramesh Warpudkar
Arts, Commerce & Science College
Sopneth Dist.Parbhani


टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

साप्ताहिक सोनपेठ दर्शन

सोमवार, दि.२३ जानेवारी २०२३

# भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त नवोदित ग्रंथांचा परिचय





सोनपेठ (दर्शन) :-सोनपेठ येथील कै.र.व.महाविद्यालयाच्या मराठी विभागाकडून दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२३ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध उपक्रमांनी साजरा होत आहे. यामध्ये दिनांक २० जानेवारी शुक्रवार रोजी राकेश वानखेडे यांचे 'गिनीपिग' कादंबरीवर मराठी विभाग प्रमुख, प्रोफेसर डॉ.बालासाहेब काळे , कोबाड गांधी यांचे मराठीत अनघा लेले यांचेकडून अनुवादित पुस्तक 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' यावर डॉ. संतोष रणखांब, तर 'कुरंगी पाडस' या गणेश आवटे यांच्या कादंबरीवर प्रा. सखाराम कदम यांनी अभ्यासपूर्ण पुस्तक परिचय सभागृहासमोर ठेवला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य वसंत सातपुते हे होते. तर प्रमुख पाहुणे डॉ. बापूराव आंधळे, डॉ.शिवाजी अंभुरे, डॉ.विठ्ठल मुलगीर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दिलीप कोरडे यांनी,प्रास्ताविक प्रोफेसर डॉ. सा.द. सोनसळे यांनी केले. तर आभार प्रा.सुरेश मोरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी तिन्ही शाखांचे बरेच विद्यार्थी उपस्थित होते.




# ग्रंथ प्रदर्शन व हस्ताक्षर स्पर्धा संपन्न





सोनपेठ (दर्शन) :-सोनपेठ येथील कै.र.व.महाविद्यालयात मराठी विभागाकडून दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२३ दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे.त्यात शुद्धलेखन व हस्ताक्षर स्पर्धा तसेच मराठी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन दिनांक १७ जानेवारी २०२३ बुधवार रोजी करण्यात आले होते.ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल डॉ.अनंत सरकाळे यांच्यासह मराठी विभाग प्रमुख डॉ.बालासाहेब काळे, डॉ. सा.द.सोनसळे, प्रा.सखाराम कदम, प्रा.सुरेश मोरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी हस्ताक्षर लेखन स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले होते.यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांनी तर वरिष्ठ महाविद्यालयातील ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.या स्पर्धेसाठी डॉ.अशोक चव्हाण, डॉ.मुक्ता सोमवंशी, प्रा.विकास रागोले व प्रा.दिलीप कोरडे यांनी मोलाचे सहकार्य केले.ग्रंथ प्रदर्शनासाठी श्री संतुक परळकर यांनी बहुमोल सहकार्य केले.

# हमीद दलवाई यांच्या जीवनावरील माहितीपटाचे प्रदर्शन




सोनपेठ (दर्शन):- कै. र. व.कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने दि.२४ जानेवारी २०२३ महाविद्यालयात मुस्लिम सत्यशोधक समाजाचे संस्थापक, सामाजिक कार्यकर्ते व लेखक हमीद दलवाई यांच्या विचार व जीवनकार्याचा परिचय करून देणा-या आणि नसरुद्दीन शाह व अमृता सुभाष अभिनित 'Hamid : The Unsung Humanist' या माहितीपटाचे प्रोजेक्टर द्वारे सादरीकरण करण्यात आले. यावेळी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. ज्योतीताई रामेश्वर कदम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. बालासाहेब काळे, डॉ. सा.द.सोनसळे, प्रा. सखाराम कदम,प्रा.सुरेश मोरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. मुकुंदराज पाटील, सदस्य प्रा. विकास रागोले, प्रा. दिलीप कोरडे, डॉ. मुक्ता सोमवंशी, प्रा. संदीपकुमार देवराये सर, प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये, डॉ. शिवाजी अंभुरे, डॉ.गोविंद वाकणकर, डॉ.संतोष रणखांब आदी मान्यवरांसह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कवी संमेलन संपन्न



सोनपेठ (दर्शन) :- सोनपेठ: कै.र.व.महाविद्यालय येथे दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी निमंत्रित कवींचे कवी संमेलन संपन्न झाले.या कवी संमेलनासाठी श्री प्रेमानंद शिंदे, वसमत व कवयित्री ड.सौ.मनीषा आंधळे हे निमंत्रित कवी म्हणून सहभागी होते.यावेळी डॉ.सा.द.सोनसळे व डॉ.सुनीता टेंगसे यांनीही आपल्या रचना सादर करून बहार आणली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.वसंत सातपुते यांनी प्रतिमापूजन केले.या कवी संमेलनात निमंत्रित कवी प्रेमानंद शिंदे यांनी आदिम काळात दगडानेच प्राण्यांची शिकार करायचा अन पोटाची खळगी भरायचा माणूस,आजही दगडानेच केली जाते शिकार माणसांकडून माणसांचीच...बहारदार या वैचारिक कवितेने समकालातील हिंस्रता विशद केली. तर -'बाई, तू दुडुंब पाटाची अन् गोड गोड थेंबाची भरलेली विहीरचं जणू...या कवितेतून स्त्री जीवनातील सार्वकालिक दुःखाला उजागर करताना संवेदनशीलतेचे अतिउच्च दर्शन घडवले.'भेतं ठेऊन चकवता येत नाही' या कवितेतून प्रेमानंद शिंदे यांनी 'माणसं गळे चिरतात स्वार्थासाठी, सत्तेसाठी, संपत्तीसाठी तश्याच भाषाही असतात हिंस्रक अन् अभिनिवेशी त्या जातात थेट धाऊन एकमेकींच्या अंगावर तर कधी सुसंस्कृत साळसूदपणाने माणसं घेतात आपल्यापेक्षा संख्येने, अक्कलेने दुबळ्या, भाबड्या असलेल्या माणसांच्या जिवंत भाषेच्या नरडीचा घोट ज्यांची पोटं हातावर आधी त्यांची भाषा मरते उपासमारीने मग माणसं मरतात पटापट त्या भाषेला जगवू पाहणारे संपत जातात भाषा लुप्त होते संवाद उरतो फक्त मेलेल्या भाषेचा एका दुस-या भाषेत लिहिला गेलेला लिपीबद्ध इतिहास जोवर भाषा जिवंत असते तोवरच जिवंत अन् प्रवाही असतात माणसं एकदा भाषेचे डबके झाले की डबघाईला लागतात ती भाषा बोलणारी माणसं भाषा असते नदीसारखी प्रवाही म्हणून धरणं बांधून तिला कोंडता येत नाही. कोंडलेल्या भाषेने कसता येत नाही कवितेचे बहारदार पीक कवी गरजेचेच असतात भाषेसाठी कारण भेतं समोर ठेऊन चकवता येत नाही भाषेला कवी लुचत, पिळत राहतात सतत म्हणूनच तर होत नसतात, भाषेच्या थानात गाठी.' या कवितेने प्रेमानंद शिंदे यांच्या कवितेची ताकद किती मोठी आहे हे दाखवून भविष्यकालीन उज्वल वाटचाली विषयी आश्वस्त केले.ड.सौ.मनीषा आंधळे यांच्या 'बरं झाले व्हाट्सअप आले' या कवितेने समग्र सभागृहाला खळखळून हसवले.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा याबद्दलची त्यांची कविता खास दाद मिळवून गेली.यावेळी डॉ.सा.द .सोनसळे यांनी 'म्या तुकारामाची माय बोलते' ही संत तुकारामांच्या आईचे मनोगत व्यक्त करणारी कविता सादर केली.तर मेसेज या कवितेतून 'मी पाठवलेला मेसेज वाटेतच अडकलाय,हृदयाचा रक्तपुरवठा बंद व्हावा तसा... तुझ्याकडे येण्याचे मार्गच बंद झालेत, मेसेजला मागेही फिरता येत नाही' ही कविता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अगदी डोक्यावर घेतली.डॉ.सुनिता टेंगसे यांनी पती-पत्नी प्रेमाविषयीची 'तुझ्या सवे नित बहरली बाग संसाराची, निखळ हास्य गाली जसे ओंजळ भरली मोगऱ्याची' ही नितांत सुंदर कविता सादर करून कवी संमेलनात एकूणच रंगत आणली. या कार्यक्रमासाठी मान्यवर कवींसोबत विचार मंचावर मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.बालासाहेब काळे, डॉ.मुकुंदराज पाटील व प्रा.सुरेश मोरे हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बालासाहेब काळे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.सखाराम कदम यांनी केले. आभार प्रा.सुरेश मोरे यांनी मानले.




Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

Principal
Late.Ramesh Warpudkar
Arts, Commerce & Science College
Sonpeth Dist.Parbhani